


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ   Mob- 9822720784   Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे   अंक : ७६२. वा   रविवार   दि. ०५ मे २०२४   पृष्ठ ८   किंमत ३रुपये

# तर मी उद्धव ठाकरेंच्या मदतीला धावून जाईन. मोदींच्या वक्तव्यावर शरद पवारांची मोठी प्रतिक्रिया...



**वृत्तसंस्था/ मुंबई**

एका प्रसिद्ध वृत्तवाहिनीच्या महामुलाखतीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील अनेक मुद्यांसह महाराष्ट्रातील राजकारणावर भाष्य केले.यावेळी त्यांनी शरद पवार यांच्यावरही टीका केली. बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले की, शरद पवार हे या वयात कुटुंब सांभाळू शकत नाही, महाराष्ट्र काय सांभाळणार असा खोचक सवाल त्यांनी केला. त्यांच्या या विधानाचे राजकीय पडसाद उमटू लागले आहेत. विरोधकांनी त्यांच्या या विधानाची निंदा करत मोदींवर हल्ला चढवला. पुढे मोदी म्हणाले, बाळासाहेबांचं माझ्यावर अतिशय प्रेम होतं. मी ते कधीच विसरू शकत नाही. माझी बाळासाहेबांवर श्रद्धा आहे, असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बाळासाहेब ठाकरेंच्या आठवणींना उजाळा दिला. तसंच उद्धव ठाकरे अडचणीत असतील तर त्यांना मदत करणारी पहिली व्यक्ती मीच असेन, असं वक्तव्यही मोदी यांनी केलं. मात्र त्यांच्या या विधानामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहे. दरम्यान, आता उद्धव ठाकरेंबद्दल केलेल्या या विधानावर स्वतः शरद पवार यांनी भाष्य केलं आहे. यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले की, नरेंद्र मोदींनी लाख काहीही म्हटलं तरी आमची प्रार्थना असेल की, उद्धव ठाकरेंना यांची मदत घेण्याची वेळ येऊ नये,फ अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली होती. कुटुंब सांभाळता आलं नाही ते महाराष्ट्र काय संभाळणार? अशी टीका नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांच्यावर केली होती.आता या टिकेला शरद पवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. मोदींनी कुठे कुटुंब सांभाळलं? मी त्यावर जाऊ इच्छित नाही. त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी चिंताजनक आहे. पण आपण व्यक्तीगत बोलणार नाही, असं शरद पवार म्हणाले.

---

## भाजीपाला विक्रेता व नगर पालिका याच्यात सभ्रंम निर्माण झाल्यामुळे भाजीबाजार चे बाधकाम बंद

**जनसंचलन/मलकापूर- प्रतिनिधी अनिलकुमार गोठी**



मलकापूर भाजी बाजार ही जागा महसूल ची असून महसूल कडून नगर पालिकेला वापरण्यासाठी दिली गेली आहे तर भाजी बाजार समितीचे पदाधिकारी यांना कोणत्या ही प्रकार ची माहिती न देता त्या ठिकाणी नवीन भाजी बाजार बाधण्यात येत असल्याने भाजी विक्रेत्यांना नोटीस तर दिल्या पण कोणाला कोणती जागा क्रमांक मिळणार अशी माहिती दिली नाही.नगर पालिकेच्या सार्वजनिक उपयोगात येणाऱ्या आठवडी बाजार परिसरातील ओटाधारक/गाळा दुकानदार टीन शेड दुकान भाजी विक्रेता यांनी आठवडी बाजार परिसराच्या जागेत बांधकाम केले असून जाण्या येण्यात अडथळा निर्माण केला आहे. नवीन बांधकामासाठी महाराष्ट्र नगर पलिका नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १७९ नुसार सार्वजनिक जागेतील अतिक्रमण काढण्याचे अधिकार त्यांना आहेत.त्यानुसार मलकापूर नगर परिषदेने या जागेतील विक्रेत्यांना नोटीसद्वारे तात्काळ जागा मोकळी करून तसे न केल्यास नगरपालिका ती जागा मोकळी करेल व त्यासाठी येणारा खर्च भजिपला विक्रेत्याकडून वसुल करण्यात येईल याकामी कोणतेही आर्थिक व इतर कोणतेही नुक्सार झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी आपली राहीलअसे नोटीस द्वारे कळवले.मात्र भाजी विक्रेत्यांना कुठले गाले अथवा जागा देण्यात येणार याबाबत खुलासा केला नाही .येथील भाजी विक्रेत्यांना रोजचे कमावून आपला उदर निर्वाह करावा लागतो.काही विक्रेते ३० ते४० वर्षांपासून व्यवसाय करीत आहे.नगर परिषदेने पर्यायी जागा न दिल्याने व पुढे येणारा पावसाळा यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ शकते.त्यामुळे या विक्रेत्यांनी चैनसुख संचेती यांच्या कडे धाव घेतली त्या वेळी मां आमदार चैनसुख संचेती यांनी भाजी पाला विक्रेते यांना योग्य तो न्याय मिळून देईन अशी ग्वाही दिली .

## जनावरांनाही उष्माघाताचा वाढता धोका!

### थंड जागेसह पाण्याचा वापर करा पशुसंवर्धन विभागाचे आवाहन



**जनसंचलन/बुलढाणा**

उन्हाची तीव्रता वाढताच, जनावरांनाही उष्माघाताचा फटका बसण्याची शक्यता बळावली आहे. विशेषतः दुभत्या जनावरांना याचा धोका अधिक आहे. त्यामुळे कडक उन्हापासून जनावरांचा बचाव करण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले.गेल्या काही दिवसांपासून वातावरणात वेळोवेळी बदल होत आहे. एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून कमाल तापमान ४० अंशांच्यावर गेले आहे. मे महिन्यात तापमान आणखी वाढू शकते. वातावरणातील उष्णता कायम आहे. त्यामुळे नागरिकांप्रमाणेच पशुंच्याही शरीराचे तापमान संतुलित ठेवण्यासाठी पशुपालकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले. जनावरांना ऐन दुपारच्या वेळेत मोकळे सोडल्यास किंवा त्यांना बांधलेल्या ठिकाणी उन्हाचा त्रास जाणवणार नाही याची प्राथमिक सध्या जिल्ह्याच्या तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे.

# भडगाव शिवारात अवैध उत्खनन करणाऱ्या तिन टिपर व जेसीबी रंगेहाथ पकडले...

## बुलढाणा तहसीलदार विठ्ठल कुमरेसह त्यांच्या पथकाची धडाकेबाज कारवाई




जनसंचलन/बुलढाणा

अवैध उत्खन्न करणाऱ्यांना आता बुलढाणा तहसील पथकाने चांगलेच धारेवर धरले आहे.त्यांच्या विरोधात मोहिम सुरू झाली आहे. दि ३ मे रोजी बुलढाणा तहसीलदार श्री विठ्ठल कुमरे यांच्यासह त्यांच्या पथकाने धडाकेबाज कारवाई केली आहे.सविस्तर वृत्त असे की, ३ मे रोजी मौजे भडगाव शिवारातील आडा रस्त्याच्या कडेला असलेल्या टेकडी गांन २२६ मध्ये अवैध उत्खन्न करतांना तिन ट्रक हायवा व १ जेसीबी विना परवाना मुरूमाची उत्खन्न करतांना आढळून आले. यामध्ये एम एच २१ बी.बी.७२८४,एमएच २८बी.बी.१७२१,एम.एच.२१ बी.एच.४७५५ क्रमांकाचे टिप्पर व जेसीबी क्रमांक एमएच२८. एव्ही०१२८ हे विनापरवानगी अवैध मुरूमाची उत्खन्न करत होते.सदर घटनास्थळांवर बुलढाणा तहसीलदार श्री विठ्ठल सिताराम कुमरे यांनी त्यांच्या पथकासह छापा टाकला असता घटनास्थळांवरून तीन ट्रक व एक जेसीबी जप्त करण्यात आले आहे. कारवाई करून जप्त करण्यात आलेले वाहने धाड पोलिस स्टेशन येथे जमा करण्यात आली आहे. हि धडाकेबाज कारवाई बुलढाणा तहसीलदार श्री विठ्ठल कुमरे व त्यांच्या पथकातील सदानंद हिवाळे म्हसला, सुनिल रामेकर कोतवाल, व सुरक्षा रक्षक गजानन शिरतापे व शासकीय वाहन चालक अशोक देवकर यांनी केली आहे.

# शिक्षण विभाग पंचायत समिती बुलढाण्याच्या वतीने एमएमएमएस व सारथी शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ संपन्न



जनसंचलन/बुलडाणा

एमएमएमएस व सारथी शिष्यवृत्ती परीक्षा २०२३-२४ या सत्रासाठी घेण्यात आल्या होत्य त्या परीक्षांतून शिष्यवृत्ती पात्र ठरलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालक तसेच शिक्षकांचा गौरव समारंभ शिक्षण विभाग, पंचायत समिती, बुलडाणा चे वतीने स्थानिक श्री शिवाजी विद्यालयात २९ एप्रिल रोजी घेण्यात आला. शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या या सर्व जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना पुढील दिशा मिळावी व अभ्यासाची गोडी टिकून रहावी यासाठी या प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आजचे विद्यार्थी हे भविष्यातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉक्टर, वकील, इंजिनिअर घडतील तसेच समाजाच्या प्रगतीसाठी काम करतील. यासाठी शिक्षण विभागातील सर्व घटकांचे कार्य हे अतुलनिय आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमधुन शिकून शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांकडून हे काम घडेल असा विश्वास यावेळी विद्यार्थ्यांना संबोधीत करतांना बुलडाणा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी पंढरी मोरे यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी शिकावे, मोठे व्हावे यासाठी स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याचा सराव जिल्हा परिषद शाळांमधुन एमएमएमएस व सारथी सारख्या शिष्यवृत्ती परीक्षांतून घडून येतो. यामुळे मुलांना शैक्षणिक चालना तर मिळतेच परंतू शिक्षण घेतांना आर्थिक हातभारही मिळतो. यासाठी विद्यार्थ्यांनी कसोशिने प्रयत्न करून हे यश संपादन केले आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान असल्याचे यावेळी बोलतांना शिक्षण विस्तार अधिकारी मनोहर मोरे यांनी म्हटले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी पालकांनी तसेच शिक्षकांनी त्यांना घडविण्यासाठी प्रयत्नरत असावे असे प्रासंगिक बोलतांना शिक्षण विस्तार अधिकारी सौ. वंदना टाकळकर यांनी सांगितले. या कार्यक्रमात एनएमएमएस शिष्यवृती परीक्षेतील ११ गुणवंत व सारथी शिष्यवृती परीक्षेतील ३१ गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. त्यासोबतच त्यांचे पालक व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास शिक्षण विस्तार अधिकारी सौ. वंदना टाकळकर, सौ. माधुरी मेमाने, मनोहर मोरे केंद्रप्रमुख पुरूषोत्तम सोनुने, विक्रम म्हस्के, सुरेश इंगळे, रामकृष्ण दांडगे, काशिनाथ शेळके, इलियास पठाण, रमेश यंगड, ज्ञानेश्वर वाघ, दिनकर सोनुने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन पठाण सर यांनी तर प्रास्ताविक पुरूषोत्तम सोनुने यांनी केले. उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचे विक्रम म्हस्के यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठीकेंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक व सर्व समग्र शिक्षा कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

# दारूच्या नशेत शिवीगाळ करून तिघांना केली मारहाण...

जनसंचलन/ देऊळगावराजा

तालुक्यातील आळंद येथे एका महिलेसह दोघांना दारूच्या नशेत शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, आळंद येथे अनुराधा शिवाजी खार्डे यांच्या घरासमोर आरोपी समाधान विठोबा खार्डे राहतो. तो नेहमीच दारू पिऊन विनाकारण रस्त्यात बसून शिवीगाळ करीत असल्याचा आरोप तक्रीत करण्यात आला आहे. १ मे रोजी समाधान खार्डे याने शिवीगाळ केल्याचे अनुराधा खार्डे यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. महिलेचा पती मधात गेले असता आरोपीने गळा पकडून खाली जमिनीवर पाडले गळ्याजवळ नख लागून ओरखडले आहे, महिलेची मुलगी भांडण सोडविण्यासाठी गेली असता तिला सुद्धा शिवीगाळ करून मारहाण केली. याप्रकरणी अनुराधा खार्डे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी समाधान विठोबा खार्डे याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# वृद्ध महिलेस मारहाण करणाऱ्या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल...

जनसंचलन/ खामगाव

क्षुल्लक कारणावरून एका वृद्ध महिलेस दोन महिलांसह एकाने मारहाण केली. ही घटना खामगाव तालुक्यातील वाघळी फाट्यावरील एका शेतात घडली. याप्रकरणी वृद्धेच्या तक्रारीवरून ग्रामीण पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तक्रारीनुसार कौशल्या रणसिंग पवार (६७, रा. कान्हेरी गवळी जि. अकोला) या वाघळी फाट्यावरील एका शेतात नातेवाईकांकडे आल्या. दरम्यान, कशासाठी आल्याचे विचारत त्यांना दोन महिलांसह एकाने मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला.याप्रकरणी पोलिस तक्रार आणि वैद्यकीय अहवालावरून ग्रामीण पोलिसांनी निर्मला मोहन सोळंके, पिंकी राजेंद्र सोळंके, रवींद्र मोहन सोळंके या तिघांविरोधात गुन्हा दाखल केला.

# पोहण्यासाठी गेलेल्या तरूणाचा गिट्टी खदानीत बुडून मृत्यू



जनसंचलन/ खामगाव

मित्रांसोबत गिट्टी खदानीवर पोहण्यासाठी गेलेल्या तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना ३ मे रोजी पारखेड शिवारात घडली. पारखेड तालुका खामगाव शिवारातील भाग एकमध्ये मोहता यांची गिट्टी खदान आहे. या गिट्टी खदानमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचून या खदानीला तळ्याचे स्वरूप आलेले आहे. या खदानीवर नेहमी पारखेड येथील अनेक तरुण पोहण्यासाठी जातात. ३ मे रोजी सुद्धा गावातील काही तरुण पोहण्यासाठी या खदानीवर गेले होते. यामध्ये ओम बाबुराव यादगिरे वय १९ या तरुणाचाही समावेश होता पोहत असताना सदर तरुण या खदानीत बुडून त्याचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे या खदानीबाबत पारखेड येथील सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण सणांसणे यांनी हरकत घेतलेली आहे. त्यामुळे या हरकतीवर तहसीलदार पाटोळे यांच्या समोर सुनावणी सुरू असतानाच सदर खदानीत ही घटना घडल्याचे सांगण्यात आले आहे. याबाबत खामगाव ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन कारवाई सुरू केली आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या अध्यक्षपदी बाळासाहेब धूड तर कार्याध्यपदी आशिष जाधव यांची निवड...

जनसंचलन/ चिखली

छत्रपती संभाजी महाराज यांची बुलढाणा शहरात दरवर्षी प्रमाणे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यामध्ये दरवर्षी १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे.बुलढाणा शहरात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात निघत असते. आमदार संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व नियोजन करण्यात येत असते.वेगवेगळ्या वेशभुषा तसेच दिखावे असे अनेक कार्यक्रम घेण्यात येत असते.बुलढाणा येथे निघणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती बघण्याकरिता लांब कोसावरून लोक बघण्याकरिता येत असतात. दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुध्दा मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात येणार आहे. त्यासाठी दि ०३ मे रोजी आमदार संजय गायकवाड यांच्या मातोश्री कार्यालयावर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.बैठकीमध्ये सर्वांनी अध्यक्ष करिता दोन नाव सुचवली होती



त्यामध्ये बाळासाहेब धूड व आशिष जाधव यांचे नाव होते.त्यामुळे दोन्ही ईश्वर चिट्टी टाकत या बैठकीमध्ये अध्यक्षपदी बाळासाहेब धूड व कार्याध्यक्षपदी आशिष जाधव तर सचिव पदी प्रा. अनिल रिंढे यांची निवड करण्यात आली आहे.

# या तारखेला मान्सून केरळात दाखल होणार तर महाराष्ट्रात या दिवशी आगमन...



वृत्तसंस्था/मुंबई

मान्सुन हा भारतासह पूर्व आशियातील बहुतेक देशांसाठी अत्यंत महत्वाचा हवामान घटक आहे. मान्सुनच्या आगमनावर शेतीसह देशाची अर्थव्यवस्थाही अवलंबून असते. त्यामुळेच त्याची चिन्हे आणि वेळापत्रक यांकडे सर्वांचेच लक्ष लागलेले असते. या वर्षी केरळमध्ये मान्सुनचा आगमन होण्याची अपेक्षा आहे तर महाराष्ट्रात त्याचे आगमन काही दिवसांनंतर होईल. मान्सुन हा एक नैसर्गिक हवामान प्रक्रिया आहे. उष्ण वायुप्रवाहांमधील बदल आणि त्यांचे हालचाल यामुळे मान्सुन निर्माण होतो. उत्तर गोलार्धातील उष्ण हवेचा प्रवाह समुद्राकडून भूमीकडे वाहायला लागतो आणि त्यामुळे मुसळधार पावसाची निर्मिती होते. या प्रक्रियेला मान्सुन म्हणतात. भारतात दरवर्षी जूनपासून सप्टेंबरपर्यंत मान्सुन पावसाचा काळ असतो. मान्सुनची सुरुवात केरळमधून होते आणि तो क्रमाक्रमाने देशभर पसरत जातो. पहिल्या टप्प्यात केरळसह कोकण किनारपट्टीवर मान्सुनची सुरुवात होते. यानंतर तो गुजरात, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात पोहोचतो. भारतीय हवामान खात्याकडून वेळोवेळी मान्सुनच्या आगमनाची अंदाजे तारखा कळवली जाते. ती अनेक निरीक्षणांवरून ठरवली जाते. या वर्षी केरळमध्ये अंदाजे ख तारखेला तर महाराष्ट्रात य दिवशी मान्सुनचा आगमन होण्याची अपेक्षा आहे. मान्सुनमुळे मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. त्यामुळे शेतीसाठी आवश्यक पाणी मिळते. शेतकऱ्यांना पिकांच्या लागवडीला सुरुवात करता येते. मात्र कधी कधी अतिवृष्टीमुळे नुकसानही होते. त्यामुळे योग्य निरीक्षण आणि खबरदारी घेणे गरजेचे असते.मान्सुनच्या येण्याची वेळ आणि त्याचा प्रभाव ही नेमकेपणाने सांगणे अवघड असले तरी त्याच्या अंदाजावरून आपण आपली तयारी करू शकतो. शेतकरी, शासकीय यंत्रणा, उद्योगसमूह सर्वांनाच त्याची उपयुक्तता असते. त्यामुळेच हवामान खात्याकडून या संदर्भातील माहिती प्रसिद्ध केली जाते आणि नागरिकांनी त्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. शेवटी, मान्सून हा भारतासारख्या शेतीप्रधान देशासाठी अत्यंत महत्त्वाचा हवामान घटक आहे. त्यामुळेच त्याच्या आगमनाची वाट सगळेच पाहतात आणि त्याची तयारी करतात. गरज आहे ती शांततेने मान्सुनचा स्वागत करण्याची आणि त्याचा लाभ घेण्याची.

# शाहू फाऊंडेशनच्या शिबिरात ४२ जणांचे रक्तदान...

## निवडणुकीची धामधूम ओसरल्यानंतरही संदीप शेळके यांनी जोपासली सामाजिक बांधिलकी

जनसंचलन/बुलडाणा



राजर्षी शाहू सोशल फाऊंडेशनच्या वतीने ४ मे रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयात आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ४२ जणांनी रक्तदान करीत उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. या शिबिरामुळे शासकीय रक्तपेढीतील रक्तसाठा वाढण्यास मोठी मदत झाली आहे. निवडणुकीची धामधूम ओसरल्यानंतरही संदीप शेळके यांनी सामाजिक बांधिलकी जोपासल्याचे यामाध्यमातून दिसून येत आहे. साधारणपणे उन्हाळ्यात बऱ्याच शस्त्रक्रिया केल्या जातात. त्यामुळे रक्ताची जास्त प्रमाणात गरज भासते. परंतु सध्या जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. ही बाब लक्षात घेऊन राजर्षी शाहू सोशल फाऊंडेशनचे संस्थापक संदीप शेळके यांनी रक्तदान शिबिर आयोजित करण्याकरिता पुढाकार घेतला. निवडणुकीची धामधूम ओसल्यानंतरही त्यांची सामाजिक बांधिलकी कायम असल्याचे यामाध्यमातून दिसून आले. युवकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करावे असे आवाहन त्यांनी केले होते. त्यांच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून शनिवारी सकाळी जिल्हा सामान्य रुग्णालयात आयोजित रक्तदान शिबिरात ४२ जणांनी रक्तदान केले. राजर्षी शाहू सोशल फाऊंडेशनतर्फे दरवर्षी रक्तदान शिबिरे घेण्यात येतात. गतवर्षी संदीप शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त ३१०० पिशव्या रक्तसंकलन झाले होते. तर यावर्षी सुद्धा ३३०० पिशव्या रक्तसंकलन झाले आहे. शासकीय रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे रक्तदात्यांनी रक्तदानासाठी पुढे यावे, असे आवाहन मी केले होते. तळपत्या उन्हातही रक्तदात्यांनी माझ्या आवाहनाला भरभरुन प्रतिसाद दिला, असे संदीप शेळके संस्थापक राजर्षी शाहू सोशल फाऊंडेशन यांनी विचार व्यक्त करून मनापासून आभार मानले.

# अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ

जनसंचलन/ चिखली



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आले आहे. या सप्ताहास २ मे पासून प्रारंभ झाला असून सांगता ९ मे रोजी महाप्रसादाने होणार आहे. या सप्ताहादरम्यान सकाळी ९ ते दुपारी ४ वाजे पर्यंत ह. भ. प. उदय महाराज गोंधीकर (संभाजीनगर) यांच्या अमृतवाणीतून भागवत कथा सांगण्यात येत असुन सप्ताह दरम्यान काकडा, विष्णुसहस्रनाम, भागवत कथा, हरिपाठ तर दररोज रात्री हरिनाम संकीर्तने होतील. यामध्ये ह.भ.प गोपाळ महाराज आळंदी देवाची येथे राहतात, ह. बी.पी. विठ्ठल महाराज झाडोकर सखाराम महाराज संस्था एलोरा, ह.भ.प. रामदास महाराज तायडे आलमपूर, ह.भ.प. गिरीश महाराज पुरोहित उदय नगर, ह.स. भा. पं. शेळके महाराज एसोळीकर, ह. भा. पं. अनिल महाराज देवळकर विनोदाचार्य पंढरीनाथ महाराज कोराळा बाजार भा. पं. कोराळा बाजारचे विनोदाचार्य पंढरीनाथ महाराज सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत कल्याण करणार असून दुपारी १२ ते ५ या वेळेत महाप्रसादाचे वाटप होणार आहे. बुधवारी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत उदयनगर येथून मिरवणूक निघणार आहे. तरी उदयनगर पंचक्रोशीतील भाविकांनी भागवत कथा व महाप्रसाद श्रवणाचा लाभ घ्यावा. असे आवाहन उदयपूऱ्या सर्व ग्रामस्थांना एका पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# विधानसभा निवडणुकीनंतरही तुम्हीच मुख्यमंत्री असणार का? असे विचारले असता शिंदेंनी सांगितलं वेगळंच टार्गेट..

वृत्तसंस्था/मुंबई

शिवसेनेत झालेलं अभूतपूर्व बंड, एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात पक्षात पडलेली उभी फूट, त्यांनी भाजपसोबत जात स्थापन केलेलं सरकार या घटनांच्या पार्श्वभूमीवर होत असलेली लोकसभेची निवडणूक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंसाठी महत्त्वाची आहे. शिवसेना कोणाची हा प्रश्नाचं उत्तर या निवडणुकीच्या निकालातून मिळेल.लोकसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाला प्रगतीपथावर नेत आहेत. त्यांच्यामुळे देशाची प्रतिमा जागतिक स्तरावर उंचावली आहे. त्यांच्या कामाला महायुती सरकारच्या कामाची चांगली जोड मिळाली आहे, असं मुख्यमंत्री शिंदेंनी हिंदुस्तान टाईम्सला दिलेल्या मुलाखतीत म्हटलं. गेल्या दोन वर्षांत राज्य सरकारनं उत्तम काम केलं. पायाभूत सुविधांच्या बाबतीत राज्य देशात पहिल्या क्रमांकावर असल्याचं त्यांनी सांगितलं.लोकसभा निवडणुकीनंतर होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महायुती विजयी झाल्यास तुम्हीच मुख्यमंत्री राहणार का? असा प्रश्न शिंदेंना विचारण्यात आला. त्यावर सध्याच्या घडीला आमच्यासाठी लोकसभा निवडणूक महत्त्वाची असेल, असं उत्तर शिंदेंनी दिलं. नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करणं याला प्राधान्य आहे. २०१९ मध्ये आम्ही जितक्या जागा जिंकल्या, त्यापेक्षा अधिक जागा जिंकण्याचं लक्ष्य आम्ही ठेवलं आहे. मोदींचं सरकार आणण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. विधानसभा निवडणूक भविष्यातील विषय आहे. पुढचा मुख्यमंत्री कोण होईल याचा विचार आम्ही करत नाही, असं शिंदे म्हणाले.महाविकास आघाडी सरकारमध्ये अर्थमंत्री असलेले अजित पवार निधी देत नसल्याचा आरोप शिंदे आणि त्यांच्या बंडात सहभागी झालेल्या आमदारांनी अनेकदा केला. पण तेच अजित पवार महायुतीत आले आणि अर्थमंत्री झाले. त्यावरही शिंदेंनी भाष्य केलं. आमचे पक्षप्रमुख मुख्यमंत्री असताना आमच्याच मंत्र्यांना काम करता येत नव्हतं. आमचे कार्यकर्ते तुरुंगात जात होते, त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल केले जात होते. पण मुख्यमंत्री काहीच करत नव्हते, असं शिंदेंनी सांगितलं.आम्ही भाजपसोबत जाऊन सरकार स्थापन केलं. राज्य सरकार चांगलं काम करतंय. अजित पवार विकासाच्या मुद्द्यावर आमच्यासोबत आले. मोदींच्या कामानं प्रभावित होऊन ते महायुतीसोबत आले. त्यांच्या पक्षात समस्या असल्यानं ते आमच्यासोबत आलेले नाहीत, असं शिंदे म्हणाले. तीन पक्षांचं सरकार चालवणं आव्हानात्मक वाटतं का?, असा प्रश्न शिंदेंना विचारण्यात आला. त्यावर आम्हाला सगळ्यांना लोकांची सेवा करण्याची आणि राज्याला पुढे न्यायचं आहे. उद्देश एक असल्यानं तीन पक्षांचं सरकार चालवणं आव्हानात्मक वाटत नाही, असं उत्तर त्यांनी दिलं.



# संजय राऊत भाजपमध्ये आले असते फडणवीसांचं राजकारण सुडाचं नाही- विनोद तावडे

वृत्तसंस्था/ पुणे

तपास यंत्रणांचा दबाव असता तर संजय राऊत हे भाजपात आले असते, असं वक्तव्य भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी केलं आहे. त्यासोबतच मी राज्याच्या राजकारणात येणार नाही आहे सध्या मी दिल्लीतच आहे. माझी भूमिका ही ओन्ली राष्ट्र-नो महाराष्ट्र अशीच आहे, असं स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केलं आहे. पुण्यात पत्रकार संघातर्फे त्यांचा वार्तालाप आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी त्यांनी विविध विषयांवर भाष्य केलं आहे. फडणवीस हे सुडाच राजकारण करत नाहीत, अन्यथा ते मुख्यमंत्री झाले असते. युती म्हणून लढलो बाळासाहेबांची मते भेटली. मग, आम्हाला सोडून जाता याला गद्दारी म्हणत नाहीत. आम्ही विचारांवर युती केली होती, असं म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला. आतापर्यंत अनेक जणांवर चार्जशीट दाखल झाले आहेत. हे सगळं दबावतंत्र असल्याचं बोललं गेलं मात्र दबावतंत्र असतं तर संजय राऊत देखील भाजपात आले असते, असंही ते म्हणाले. मी राज्याच्या राजकारणात येणार नाही. सध्या मी दिल्लीतच आहे. माझी भूमिका ही ओन्ली राष्ट्र-नो महाराष्ट्र अशीच आहे, असंही त्यांनी स्पष्ट केले. त्यासोबतच भाजपमध्ये सर्व निर्णय हे केंद्रीय नेत्यांशी चर्चा करुन घेतले जातात. त्यामुळे प्रत्येक निर्णय विचारपूर्वक घेतले जातात, असंही ते म्हणाले. सध्या राज्यात महाविकास आघाडी आणि महायुतीत अनेक प्रकारच्या टीका टिप्पण्या होताना दिसत आहे. त्यावर बोलताना विनोद तावडेंनी देखील



आपलं मत व्यक्त केलं आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सुनेबद्दल बोलणे हा शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रातील प्रचार असू शकत नाही. पवारांप्रमाणेच खासदार संजय राऊत यांनी महायुतीच्या अमरावतीच्या उमेदवाराबद्दल केलेले वक्तव्य यापूर्वी कधीही महाराष्ट्राच्या प्रचारात ऐकायला मिळाले नाही. महाराष्ट्रात मात्र विरोधकांकडून ज्या पद्धतीने प्रचार केला जात आहे, ते पाहता हा काही शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रातील प्रचार नाही, असं तावडे म्हणाले.

# चिठ्ठी लिहून युवतीने केले पलायन

जनसंचलन/ शेगाव

वडीलांच्या उशाखाली चिठ्ठी सोडून एका २० वर्षीय युवतीने घरातून पलायन केल्याची फिर्याद युवतीच्या वडीलांनी शहर पोस्टेला ३ मे रोजी दिली आहे. फिर्यादी कैलास रामभाऊ झाडे वय ४८ रा. दसरा नगर यांनी शहर पोस्टेला दिलेल्या फिर्यादीनुसार, रात्री घरी झोपलेले असतांना पहाटे ३ वा. च्या सुमारास रेश्मा कैलास झाडे ही घरी कोणाला काही एक न सांगता निघून गेली आहे. जातांना तिने एक चिठ्ठी लिहिल्याचे आढळून आले असून त्यामध्ये बाबा, आता तुम्ही मला शोधू नका, मी त्याचे सोबत आहे. युवतीने घरून जातांना मोबाईल किंवा इतर कोणतेही शालेय कागदपत्रे सोबत नेलेले नाहीत. तरी मुलीचा शोध घेण्यात यावा अशी विनंती



फिर्यादी यांनी पोलिसांना केली असून फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलिसांनी मिसींग दाखल करून तपास पोहेकॉ. विनायक सरोदे यांच्याकडे सोपविला आहे, पोलिसांनी युवतीच्या बाबतीत दिलेल्या माहितीनुसार युवतीचा रंग गव्हाळ, बांधा सडपातळ, उंची ५.४ इंच, अंगात कथीया रंगाचा कुर्ता, पांढरा रंगाचा सलवार, पायात चप्पल, केस काळे भोर आहेत.

# बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाच्या अध्यक्षपदी ॲड.राजेंद्र उमाप यांची निवड



वृत्तसंस्था/पुणे

राज्यातील वकिलांची शिखर संघटना असलेल्या बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवाच्या अध्यक्षपदी पुणे येथील ॲड. राजेंद्र उमाप यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांना उपाध्यक्ष पदी काम करण्याची दोनदा संधी मिळाली आहे. सध्याही ते उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यानंतर त्यांना आता अध्यक्षपदाची संधी मिळाली आहे. या बार कौन्सिलमध्ये महाराष्ट्र आणि गोवा ही दोन राज्ये आणि दादर नगर हवेली आणि दिव दमण या दोन केंद्रशासित प्रदेशांचा समावेश आहे. दोन लाखाहून अधिक वकील या संघटनेचे सभासद आहेत. त्यांनी यापूर्वी पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. ते सध्या आळंदी देवाची येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटीचे प्रमुख विश्वस्त आहेत. ते चिंचवड देवस्थानचे ट्रस्टचेही विश्वस्त आहेत. ज्यामध्ये मोरगाव, सिध्दटेक आणि थेऊर अष्टविनायकचा समावेश आहे. याशिवाय विविध पदे ते भूषवित आहेत. वकिलांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार आहे. वकिलांची सुरक्षितता, आरोग्य विषयक आणि इतर प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करणार आहे. बार कौन्सिलचे डिजिटलायझेशन करण्यावर भर असणार आहे. प्रत्येक बार असोसिएशनला बार कौन्सिलच्या योजना लवकरात लवकर माहित होण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. वकील अकादमीसाठी जागा मिळाली आहे. त्यासाठी आवश्यक परवानग्या मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. बार कौन्सिलच्या वतीने २०२० पासून झालेल्या नवीन वकिलांचे मोफत मेडिक्लेम आणि अपघात क्लेम काढण्यात येत आहेत.ॲड. राजेंद्र उमाप, नवनिर्वाचित अध्यक्ष, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा.